**<u>ई–फाईलींग</u>**
**इतर किरकोळ फौ. अर्ज. क्र. ३२३/२०२४**
निशाणी क्र. १ खाली

# <u>फिर्यादीचे सत्यपाण</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की –
माझे नाव – सखुबाई श्रीराम मारकड
वय – ४२ वर्ष, व्यवसाय – शेती
राहणार – लाखेवाडी, ता. इंदापूर, जि.पुणे.

१. आरोपी क्र.१ श्रीराम मारकड हे माझे पती आहेत. आरोपी क्र. २ सुर्यभान मारकड हे माझे दिर आहेत. आरोपी क्र.३ चंद्रकला सुर्यभान मारकड ही माझी जावू आहे. तसेच आरोपी क्र.४ बाबु सुर्यभान मारकड हा माझा पुतण्या आहे. सन १९९४ माझे आरोपी क्र.१ सोबत माझे लग्न झाले. त्यानंतर आरोपींनी मला दोन ते तीन वर्षे चांगले नांदविले. आरोपी क्र.२ दिर हा माझ्या पतीस म्हणत होता की, तुझी बायको चांगली नाही, तिला सोडू दे. दरम्यानच्या काळात मला दिवस गेले. माझे प्रस्तुती झालेनंतर माझे माहेरी माझे पती व इतर सासरचे लोक मला बघायला आले नाहीत. त्यानंतर दोन ते तीन महिने वाट पाहिले त्यानंतर मी मुंबईला माझ्या भावाकडे राहण्यास गेले.

२. त्यानंतर दोन ते तीन वर्षांनी माझा दिर आरोपी क्र.२ हा घरी आला होता व त्याने माझेसोबत खुप भांडण केले. मी माझ्या भावाला बोलावून घेतले, त्याचेसोबत मी माहेरी गेली. परंतू आरोपींनी मला चार ते पाच वर्ष काही विचारपूस केली नाही. त्यानंतर मी मुंबईला पुन्हा आरोपींच्याकडे राहण्यास गेले असता माझे पती आरोपी क्र. १ ने मला दोन ते तीन दिवस घरात घेतले नाही. घरमालकाने माझ्या पतीस समजावून सांगितल्यानंतर माझ्या पतीने मला घरात घेतले. माझा पती नेहमी दारु पिवून येवून मला मारहाण करुन शिवीगाळ करीत होता. तसेच तो मला घरातून हाकलून देवून रात्र–रात्रभर घराच्या बाहेर बसवित होता.

३. दिनांक १५/०५/२०२४ रोजी मौजे केज, जि. बीड येथे माझे पतीच्या घरी मुलाच्या शिक्षणासाठी जातीचा दाखल कामी कागदपत्रे मागण्यासाठी केले असता तेथे आरोपी क्र. १ ते ४ यांनी मला शिवीगाळ करुन जबर मारहाण केली. त्यानंतर मी केज पोलीस

स्टेशनला जावून आरोपींच्या विरुध्द तक्रार दिली. त्यानंतर आम्ही आमच्या घरी लाखेवाडी येथे आलो. त्यानंतर आरोपीं हे दुस–या दिवशी सकाळी गाडी घेवून आमच्या घरी आले. त्यांनी मला आले आल्या शिवीगाळ केली. माझी जावुबाई मला केस धरुन मारहाण केली. तसेच सर्व आरोपींनी माझ्या अंगावर पडून मारहाण करीत असतांना माझा मुलगा माझ्या मामास बोलविण्यास गेला. त्यावेळी आमच्या शेजारच्या लोकांनी माझी सोडवणुक करुन आरोपींना हाकलून दिले. आरोपी क्र. २ व ४ हे मला वारंवार धमकी देतात की, तुला व तुझ्या मुलाला जीवाने मारुन टाकीनं. त्यामुळे माझी या न्यायालयास विनंती आहे की, आरोपींनी कडक शासन व्हावे व मला न्याय मिळावे.

.............................

फिर्यादीची सही / अंगठा

दिनांक– २१/०१/२०२५

समक्ष

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2025.01.21 18:31:18 +0530

( एम. एच. फारुकी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, इंदापूर.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Shri. Chalwade G.S. (Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui,<br>Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C., Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 21/01/2025 |
| Order signed by the presiding officer on | :- | 21/01/2025 |
| Order uploaded on | :- | 21/01/2025 |